# कलम १९ अधिसूचना

क्र.कावि/अका/भुसं/१२६२/२०१९
उपविभागिय अधिकारी खामगांव
यांचे कार्यालय दि. २५ /०९/२०१९

क्रमांक:- भुसंप्रक्र.एलएक्यु/घुई /४५/२०१२-१३ मौजा- घुई ता. शेगांव जि.बुलडाणा.

ज्या अर्थी समुचित शासन असलेल्या बुलडाणा जिल्हयाच्या जिल्हाधिका-याने, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनस्थापना करतांना वाजवी भंरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम,२०१३ ( २०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश उक्त अधिनियम असा केला आहे) यांच्या कलम ११ च्या पोटकलम (१) व्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, अधिसूचना, क्रमांक १६८०/२०१८ दिनांक १७/१२/२०१८ अन्वये प्रारंभीक अधिसूचना काढली आहे आणि त्याव्दारे असे अधिसूचित केले आहे की, या सोबत जोडलेल्या अनुसुचित अनुसूची एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीची अनुसूची दोन मध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनीक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी, बुलडाणा ( जिल्हयाच्या ) जिल्हाधिका-याने, कलम १५ च्या पोटकलम (२) अन्वये दिलेला अहवाल, कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे या बाबत त्याची खात्री पटली आहे, आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोटकलम ( १ ) च्या तरतुदीन्वये, उक्त सार्वजनीक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे असे या व्दारे घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, अनुसूची तीन मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधीत कुटुंबियाच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी " पुनर्वसाहत क्षेत्र " म्हणून निर्धारीत केले असल्याचे या व्दारे घोषित केले जात असून, पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसुची चार मध्ये विनिर्दिष्ट केला आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड ( छ ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी , उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिकारी यांची कार्य पार पाडण्यासाठी उपविभागिय अधिकारी तथा भुसंपादन अधिकारी खामगांव यास पदनिर्देशित करीत आहे.

कलम १९ च्या प्रसिध्दीमध्ये खालीलप्रमाणे क्षेत्र दर्शविण्यात आले आहे.

अनुसुची -१

जमिनीचे वर्णन

गांव- घुई तालूका- शेगांव जिल्हा - बुलडाणा

भुसंपादन प्रकरण क्रमांक.एलएक्यु/ घुई /४५/२०१२-१३

| अ.क्र. | गट नं. | संपादन जमीनीचा तपशिल | | | वगळण्यात आलेले आदमासे क्षेत्र | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | वाहीती क्षेत्र हे.आर | पो.ख | एकुण क्षेत्र हे.आर | गट नं. | वाहीती क्षेत्र हे.आर | पो.ख | एकुण क्षेत्र हे.आर |
| १ | २०० | ०.०१ | ० | ०.०१ | ० | ० | ० | ० |
| २ | २०० | ०.०४ | ० | ०.०४ | ० | ० | ० | ० |
| ३ | १९९ | ०.०५ | ० | ०.०५ | ० | ० | ० | ० |
| ४ | १९२ | ०.०४ | ० | ०.०४ | ० | ० | ० | ० |
| ५ | १९३ | ०.०७ | ० | ०.०७ | ० | ० | ० | ० |
| ६ | ३० | ०.०२ | ० | ०.०२ | ० | ० | ० | ० |
| | | ०.२३ | | ०.२३ | ० | ० | ० | ० |

**संपादन करावयाचे एकुण क्षेत्र- ०.२३ हे.आर**

## अनुसूची-२

सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण

**प्रकल्पाचे नांव:-** कवठा बॅरेज प्रकल्प

**प्रकल्पकार्याचे वर्णन:-** मौजा घुई येथील जमिन कवठा बॅरेज प्रकल्पाच्या कामा करीता

**समाजाला मिळणारे लाभ :-** या प्रकल्पामुळे शेतिसाठी पाणी व सार्वजनीक पाणि पुरवठा व उद्योगांना पाणी पुरवठा होणार आहे. त्याच बरोबर ग्रामिण भागांमंधे रोजगार निर्मिती होणार असून , ग्रामिण भागातील कष्टकरी, शेतकरी व भुमिहीन शेत मजुर यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत.

## अनुसूची-३

पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन

गांव:- घुई ता.:- शेगांव, जि.:- बुलडाणा

| अनुक्रमांक | गट नंबर. | अंदाजित क्षेत्र ( चौ.मी.) |
|---|---|---|
| — | निरंक | |

## <u>अनुसूची-४</u>

( पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश )

निरंक

टिप :- उक्त जमिनीच्या आराखडयाचे अभिलेख उपविभागिय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी खामगांव यांचे कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

दिनांक:- ९ / ०५ / २०१९

ठिकाण :- बुलडाणा

उपविभागिय अधिकारी तथा
भूसंपादन अधिकारी खामगांव

जिल्हाधिकारी बुलडाणा